# नगर परिषद जामनेर जि.जळगांव

राजमाता जिजाऊ चौक, जामनेर-४२४२०६ ☎०२५८०-२३२५२४

संकेतस्थळ : https://www.mahaulb.in ईमेल :cojamner@gmail.com


जा.क्र.नपजा/साप्र/२५३७/२०२४ दिनांक. २८/११/२०२४

## आदेश

विषय- नागरी स्थानिक स्वराज्य संस्थाना मा.उच्च न्यायालय मुंबई यांच्या निर्देशान्वाये रस्त्यांवरील खड्यांच्या संदर्भात स्थानिक पातळीवर समितीची रचना करणेबाबत.

संदर्भ- मा. उच्च न्यायालय मुंबई दाखल जनहित याचिका क्रमांक.७१/२०२३ व अवमान याचिका क्रमांक.६/२०१९

ज्याअर्थी मा. उच्च न्यायालय मुंबई येथे दाखल जनहित याचिका क्रमांक.७१/२०२३ व अवमान याचिका क्रमांक.६/२०१९ च्या संदर्भात महानगरपालिका सह राज्यातील सर्व नागरिक स्थानिक स्वराज्य संस्थाना मा.उच्च न्यायालय मुंबई यांनी रस्त्यांवरील खड्यांच्या संदर्भात स्थानिक पातळीवर समितीची रचना करून प्राप्त दाव्यांवर निर्णय घेण्याच्या अनुषंगाने मा.विभागीय आयुक्त तथा प्रादेशिक संचालक नगरपालिका प्रशासन जळगाव विभाग कार्यलय यांच्या कडून सूचना देण्यात आलेल्या आहेत. त्या अनुषंगाने खालील प्रमाणे समिती गठीत करण्यात येत आहे.

| अ.क्र | समिती सदस्यांचे नाव | समिती सदस्य |
|---|---|---|
| १ | मुख्याधिकारी, जामनेर नगरपरिषद | अध्यक्ष |
| २ | पोलीस निरीक्षक, पोलीस स्टेशन जामनेर | सदस्य |
| ३ | उपअभियंता, सार्वजनिक बांधकाम उपविभाग जामनेर | सदस्य |
| ४ | नगरअभियंता, जामनेर नगरपरिषद | सदस्य |
| ५ | रचना सहाय्यक, जामनेर नगरपरिषद | सदस्य |

उपरोक्त प्रमाणे गठीत करण्यात आलेल्या समितीची मा. उच्च न्यायालय मुंबई दाखल जनहित याचिका क्रमांक.७१/२०२३ व अवमान याचिका क्रमांक.६/२०१९ च्या निर्देशाप्रमाणे राहील याची सर्वांनी नोंद घ्यावी.

जामनेर नगर परिषद स्था.दि. २८/१०/२००२ ता.जामनेर,जि.जळगाव

(नितीन बागुल)
मुख्याधिकारी तथा प्रशासक
नगर परिषद जामनेर

